# सजगतेचा सशक्त संदेश

सप्टेंबर ०१, २०२५



*सजगतेचा सशक्त संदेश*

***श्री शिवाजी विद्यालय शहर शाखा हरिहर पेठ येथे सायबर जनजागृती शिबीर***

***प्रणाली पिंपळकर व पूर्वा ताथेंचे मार्गदर्शन***



*अकोला :*

*डिजिटल जगाचा वेगाने वाढणारा वापर जितका उपयुक्त आहे, तितकेच त्यातील धोकेही गंभीर स्वरूपात समोर येत आहेत. ऑनलाईन खरेदी, मोबाईल बँकिंग, सोशल मीडिया यामध्ये जपावयाची काळजी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शंकरलाल खंडेलवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला आणि किक हील फाउंडेशन, पुणे यांच्या सहकार्याने श्री शिवाजी विद्यालय शहर शाखा हरिहर पेठ, अकोला येथे सायबर जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.*

*या उपक्रमात विद्यार्थिनींनी स्वतःच्या सादरीकरणातून अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले. फेक कॉल्स व फिशिंग ई-मेल्सची ओळख कशी पटवावी, AI तंत्रज्ञानाचा गैरवापर करून होणारे फ्रॉड्स, ऑनलाईन गेम्स व फ्री गिफ्ट्सच्या आमिषातून होणारी फसवणूक, तसेच वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी वापरायचे उपाय याबद्दल त्यांनी स्पष्टपणे मार्गदर्शन केले.*

*विशेष म्हणजे, विद्यार्थिनींनी दाखले व उदाहरणांचा वापर करून प्रेक्षकांमध्ये "सावधानता हाच बचावाचा मार्ग" हा संदेश पोहोचविला व सायबर सुरक्षेची शपथ सुद्धा घेतली.*

*या शिबिराचे मार्गदर्शन शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचा विद्यार्थिनी कु. प्राणली पिंपळकर व कु. पूर्वा ताथे यांनी केले. त्यांनी विद्यार्थिनींना केवळ माहिती देण्यापुरते न ठेवता जागरूक डिजिटल नागरिक घडविण्याचे ध्येय समोर ठेवले.*

*खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि सायबर शिक्षण समन्वयक डॉ. दीप्ती पेठकर यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या प्रेरणेमुळेच विद्यार्थिनींनी आत्मविश्वासाने विविध मुद्दे मांडून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.कार्यक्रमाच्या वेळी विद्यालयाचे प्राचार्य श्री. मनोज देशमुख व श्री. एच सपकाळ, श्री. ए काळुसे, श्रीमती. ए मराठे,श्री.के तायडे,श्री. पंकज देशमुख,श्री. पी जंजाळ, सौ.पी कराळे, कु. के वाकोडे, श्रीमती. व्हि नेमाडे, कु. शीतल मोरे इत्यादी ,शिक्षकवर्ग हजर होता. श्री. एन देशमुख, श्री.व्हि टेकाडे, श्री.ए गावंडे, इत्यादी कर्मचारी वर्ग उपस्थित होते.मान्यवरांनी विद्यार्थिनींच्या या उपक्रमाचे कौतुक करून तो भविष्यातील सशक्त समाज घडविण्यासाठी आवश्यक पाऊल असल्याचे नमूद केले. उपक्रम विद्यार्थिनींमध्ये डिजिटल सुरक्षिततेची बीजे पेरणारा ठरला असून, सायबर गुन्ह्यांविरुद्ध सजग राहून सुरक्षित समाज निर्माण करण्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.*